## प्रेसनोट दि. २७/११/२०१७

## दिड वर्षापासून अल्पवयीन मुलीच्या बलात्काराच्या गुन्हयातील फरारी असलेल्या आरोपीस गुन्हे शाखा, युनिट १ ने भिगवण येथून केली अटक

दिनांक २७/११/२०१७ रोजी पो.ना. इरफान मोमीन व श्रीकांत वाघवले यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे दिड वर्षापासून दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीच्या बलात्काराच्या गुन्हयातील फरारी असलेला आरोपी नामे प्रेमनाथ नरसींग काटकर, वय २३ वर्षे, रा डी. प्लॉट नं. ११, रेल्वे स्टेशनजवळ, शिवाजीनगर, पुणे मुळ रा. गांव सरवडे, ता. निलंगा, जि. लातूर हा भिगवण, ता. इंदापूर येथे एका हॉटेलमध्ये काम करीत असलेबाबत महिती मिळाली होती. सदर बातमी आम्ही मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितीन भोसले पाटील यांना कळवून त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे आंम्ही लागलीच सदर ठिकाणी जावुन, वरील इसमास ताब्यात घेतले.

त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे दाखल गुन्हयाबाबत विचारणा केली असता, त्याने शिवाजीनगर येथे रहाणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर सुमारे दिड वर्षापूर्वी बलात्कार केला होता व तो त्याचे मुळ गावी पळून गेला होता नंतर तो भिगवण येथे हॉटेलमध्ये काम करीत होता. सदर बाबत शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८३/२०१६ भादविक. ३७६ सह पास्को कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीस पुढील कारवाई कामी शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.ना. इरफान मोमिन, श्रीकांत वाघवले, सचिन जाधव, इम्रान शेख, पो.हवा. राजू पवार, उमेश काटे, सुभाष पिंगळे, रिजवान जिनेडी, तुषार खडके, राजाराम सुर्वे, प्रकाश लोखंडे, महेबुब मोकाशी, अशोक माने, प्रशांत गायकवाड, गजानन सोनुने, मोहन येलपले, यांनी केली आहे.